# भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष

# Revolutionary Workers' Party of India

## महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 जाहीरनामा

**येत्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत कामगार-कष्टकऱ्यांचा स्वतंत्र राजकीय पर्याय मजबूत करा!**

**भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाच्या उमेदवाराला मत द्या!**

# 1. **प्रस्तावना**

साथींनो! मित्रांनो! कामगार-कष्टकरी भावांनो, बहिणींनो! महाराष्ट्र 2024 विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने, पुन्हा एकदा एका स्वतंत्र कामगार वर्गीय राजकारणाची आणि पक्षाची पायाभरणी करण्याचा, आणि क्रांतिकारी परिवर्तनाच्या किमान कार्यक्रमाचा प्रश्न घेऊन भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष (आर.डब्ल्यु.पी.आय., RWPI) निवडणुकीत हस्तक्षेप करत आहे, आणि पुण्यातील पर्वती व मुंबईतील मानखुर्द-शिवाजीनगर मतदारसंघातून उमेदवार देत आहे.

2024 मध्ये अठराव्या लोकसभेच्या निवडणुकांनंतर लगेचच महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, धर्म-जातीवादाचे राजकारण यांना नाकारत, मोदी सरकारच्या प्रचंड बहुमताच्या इराद्यांना जनतेने सुरुंग लावत, भाजपला बहुमत मिळू दिले नाही, आणि केंद्रात भाजपला एन.डी.ए.चे सरकार बनवावे लागले. यामुळे **भाजपला थोडा धक्का लागला आहे, परंतु त्यांचे फॅशिस्ट इरादे कुठेही कमजोर झालेले नाहीत,** आणि हरियाणातील विजयाने लोकसभेतील पिछेहाटीचे दुःख थोडे कमीही केले आहे. काँग्रेस व मित्र पक्षांच्या जागांमध्ये देशभरात, आणि विशेषतः महाराष्ट्रात लक्षणीय वाढ झाली. यामुळे आता "महाविकास आघाडी"च्या नेत्यांमध्ये आणि समर्थकांमध्ये उत्साही वातावरण आहे, तर दुसरीकडे "महायुती" सुद्धा जिंकण्याचा दावा अतिउत्साहाने करत आहे. दोन शिवसेना, दोन राकाँ, काँग्रेस, भाजप, मनसे, वंचित, एमआयएम सारख्या अनेक पक्षांच्या आपसातील सुंदोपसंदीने, आणि वैचारिक गोंधळलेपणाने, चर्चाविश्व भरले आहे. अशामध्ये मेहनत करणाऱ्या सर्व जनतेने, विद्यार्थी, युवक, महिला, अशा सर्वांनी प्रश्न विचारण्याची गरज आहे की धंदेबाज-निवडणुकबाज पक्षांच्या प्रचारापुढे जाऊन, तात्कालिक बेरजा-वजाबाकीची गणिते सोडून, आपल्या खऱ्या मागण्या, आपली राजकीय भुमिका काय असली पाहिजे.

भांडवली पक्षांद्वारे आजचे चर्चाविश्व काय बनवले गेले आहे? मराठा-ओबीसी-धनगर व इतर आरक्षणाच्या भरकटवणाऱ्या वल्गना, लाडक्या बहिणीचे दिखावी कोडकौतुक, "गद्दार कोण" याच्या गावगप्पा, रोज उठसुठ

"गोमाता, लव्ह जिहाद, लॅंड जिहाद, वक्फ बोर्ड" सारखे तणावाचे मुद्दे आणि खरे-खोटे हिंदुत्ववादी व सर्वधर्मसमभावी कोण याचे दिखावी वाद, बिहारी-उत्तरप्रदेशी कामगारांनी नोकऱ्या पळवल्याचा अपप्रचार, प्रकल्प गुजरातला नेल्यामुळे मराठी माणसाचा रोजगार गेल्याचा फसवा प्रचार, भारताची नाही तर पाकिस्तान-चीनची वाईट स्थिती, कोणता पक्ष किंवा गट जास्त भ्रष्टाचारी याचे होणारे खरे(!) आरोप-प्रत्यारोप, कोण किती खोक्याला विकला गेला याच्या चर्चा, पुतळ्यांचे राजकारण, प्रकल्प कोणी आणले आणि "काम कोण करते" (म्हणजे भांडवलदारांची सेवा कोणी केली) याच्या श्रेयाचे भांडण, आणि यापलीकडे सकाळ-दुपार-संध्याकाळ पक्ष बदलणे, आघाडी बनवणे आणि फोडणे, हे आहेत भांडवली पक्षांकरिता, भांडवलदारांच्या मीडियाकरिता रोज रवंथ करण्याचे मुद्दे. प्रश्न विचारण्याची गरज आहे की महागाई, मेहनतीची लूट, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, घरकुल, पेंशन, महिला-पुरुष असमानता, महिला सुरक्षा, जातीप्रथा, धर्मवाद, या आपल्या खऱ्या प्रश्नांवर योग्य कार्यक्रम काय असला पाहिजे.

**प्रश्न विचारण्याची गरज आहे की भांडवलदारांच्या विकासालाच जनतेचा विकास मानणाऱ्या, आणि म्हणूनच सर्वांना सर्व आश्वासने देणाऱ्या कॉंग्रेस, दोन्ही राकॉं, भाजप, दोन्ही शिवसेना, मनसे, आप, वंचित, एमआयएम सारख्या पक्षांचे वर्गचरित्र काय? ते कोणत्या वर्गांची सेवा करतात, आणि आपले वर्गहित काय आहे.**

खरेतर भांडवली निवडणुकांच्या माध्यमातून आजपर्यंत आपण या किंवा त्या भांडवलदार वर्गाच्या पक्षाला निवडून देत आलो. टाटा-बिर्ला-अंबानी-अडानी सारखे उद्योगपती, मोठमोठे बिल्डर, ठेकेदार, ट्रांसपोर्टर, धनिक शेतकरी, आडते, कृषीउद्योजक, व्यापारी, अशा मालकवर्गाच्या पैशांवर पोसलेल्या कॉंग्रेस, भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, मनसे, रिपाई, बसप, वंचित, एमआयएम, आप इत्यादी भांडवली पक्षांना आपण मते देत होतो, निवडून देत होतो, आणि आलटून-पालटून, वाटणीच्या भांडणात विविध पक्ष सोडून-तोडून-जोडून, स्वातंत्र्यानंतरच्या सत्तर वर्षांमध्ये सत्तेवर आलेल्या सर्वांनी भांडवलदार-मालक वर्गाची इमानेइतबारे सेवा केली आहे. **भांडवली निवडणूक कोणीही जिंको, हारते ती जनता.** सत्ता कोणत्याही पक्षाची येवो,

राज्य तर भांडवलदार वर्गच करतो. आजवर जे पण उमेदवार निवडले जात होते, **या भांडवली निवडणुकांमध्ये विविध भांडवली पक्षांचे जे पण उमेदवार निवडले जातात, ते मत तर आपले घेतात, पण सेवा मात्र देशातील मोठ्या मालकांची, बिल्डरांची, उद्योगपतींची, धनिक व्यापाऱ्यांची, ठेकेदार, दलालांची, धनिक शेतकऱ्यांची, नोकरशहा आणि मोठे पगार घेणाऱ्या अतिधनाढ्य वर्गाची करतात, ज्यांना आपण एकंदरपणे भांडवलदार वर्ग म्हणतो**

हा पूर्ण वर्ग काहीच उत्पादन करत नाही, काहीच बनवत नाही, पण जे काही निर्माण होते किंवा बनवले जाते त्यावर याचेच नियंत्रण असते आणि त्याच्या 70 ते 80 टक्क्यांचा उपभोग हाच वर्ग घेतो. हा वर्ग देशामध्ये किती संख्येमध्ये आहे? खूप झाले तर **लोकसंख्येच्या जवळपास 10 टक्के. पण देशाच्या 70 टक्यांपेक्षा जास्त संसाधने आणि संपत्तीवर यांचाच कब्जा आहे.** हाच तो वर्ग आहे जो भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, मनसे, वंचित, सपा, बसपा, आप, जद(यू), जद(सेक्यु), तृणमूल, द्रमुक, अद्रमुक, अकाली दल, टीआरएस, टीडीपी, आरपीआय, भारिप, माकप, भाकप, इत्यादी देशातील सर्व पक्षांना निवडणुक निधी पुरवतो.

हेच कारण आहे की प्रस्थापित सर्व पक्ष भांडवलदार वर्गाच्याच कोणत्या ना कोणत्या हिश्श्याचे प्रतिनिधित्व करतात आणि हेच कारण आहे की कामगार आणि कष्टकऱ्यांकडून मत घेऊन सुद्धा, ते सेवा मात्र याच भांडवलदार वर्गाची करतात**. याचमुळे देशातील कामगार आणि कष्टकऱ्यांनी मिळून 2018 साली भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष (Revolutionary Workers’ Party of India—RWPI), या नवीन पक्षाची स्थापना केली.**

## 2. महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्षांचे वर्ग चरित्र

**असे म्हणतात की ज्याचे खावे, त्याचे गावे. ‘काँग्रेस का हाथ गरिबों के साथ’ किंवा भाजपचा ‘सबका साथ सबका विकास’ सारखा नारा सर्व जनतेचा पक्ष असल्याचा आभास निर्माण करतात, पण वास्तवात ते फक्त भांडवलदार वर्गाचेच हित जपतात.**

भांडवलशाही मध्ये कामगारांच्या श्रमाला लुटूनच मालकवर्ग श्रीमंत होत जातो. कामगारांनी स्वस्तात जास्तीत जास्त तास राबावे हीच त्यांची अपेक्षा असते. बाजारावर नियंत्रण, कच्च्या मालाचे स्त्रोत, दळणवळणाच्या सुविधा, कामगारांचा पुरवठा, इत्यादींकरिता त्यांना राजकीय सत्तेची गरज असते. पण भांडवलदारांमध्ये स्पर्धा असते: बाजाराकरिता, नफ्याकरिता, लुटीच्या वाटण्यांकरिता. ती एकाच उत्पादन क्षेत्रातील (उदा. सिमेंट क्षेत्र) भांडवलदारांमध्येही असते, विविध प्रदेशांमधील भांडवलदारांमध्ये (उदा. मराठी विरुद्ध गुजराती), मोठ्या भांडवलदारांमध्ये आपापसात (उदा. टाट विरुद्ध बिर्ला), औद्योगिक विरुद्ध कृषी भांडवलदारांची (उदा. हमीभावाच्या विरोधात व बाजूने), मध्यम-छोट्या-आणि मोठ्या भांडवलदारांची एकमेकांविरोधात सुद्धा असते. त्यामुळेच त्यांना आपापल्या वेगवेगळ्या वर्ग हितांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध पक्षांची गरज सतत भासत असते. त्यामुळे असे पक्षही आपापसात “वाटणीची” स्पर्धा करतात, म्हणजेच सरकारी कंत्राटे कोणाला मिळावीत, कोणाच्या प्रकल्पांना वेगाने परवानग्या मिळाव्यात, सरकारी अनुदाने कोणाला मिळावीत, कर कोणाचे कमी व्हावेत, नियम कसे स्वहिताचे बनावेत, निर्णायक जागी आपला माणूस कसा असावा, आपल्या फाईल्स वेगाने पास व्हाव्यात, सरकारी भ्रष्टाचाराचा मोठा वाटा आपल्याला मिळावा, आपले गुन्हे माफ वा नजरेआड केले जावेत, इत्यादी हितांकरिता स्पर्धा करतात; पण हे सर्व एकत्रितरित्या मात्र कामगार वर्गाच्या विरोधात असतात, कारण आपण स्वस्तात जास्त मेहनत करून संपत्ती तयार केल्याशिवाय यांच्या लुटीच्या वाटण्यांची भांडणे सुद्धा होऊ शकत नाहीत.

आज आपल्यासमोर असलेले सर्व पक्ष, काँग्रेस, दोन्ही राष्ट्रवादी, भाजप, दोन्ही शिवसेना, मनसे, वंचित, रिपाई, सीपीआय, सीपीएम, स्वाभिमानी, आप, शेकाप, एम.आय.एम., इत्यादी हे सर्व भांडवलदार वर्गाच्या, मालक वर्गाच्या वेगवेगळ्या हिश्श्यांचे प्रतिनिधित्व करतात. यांचे बहुसंख्य नेते आणि आमदार-खासदार-नगरसेवक हे स्वतः बिल्डर-ठेकेदार-उद्योगपती-करोडपतीच आहेत!

स्वातंत्र्यापूर्वीपासूनच **काँग्रेस** नेहमीच भांडवलदार वर्गाची प्रतिनिधी होती आणि 60 वर्षे देशातील धनकुबेरांचा विकास काँग्रेस-राष्ट्रवादीने घडवला हे सर्वच जाणतात. **भाजप** फक्त भांडवली पक्ष नाही तर तो फॅशिस्ट पक्ष आहे, जो आर्थिक संकटाच्या आणि इतर काळातही भांडवलदार वर्गासाठी, मालक वर्गासाठी, कष्टकरी-कामगारांचे कायदामान्य आणि कायदाबाह्य दमनाचे काम करतो. आर.एस.एस. आणि त्यांच्या बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, अभाविप सारख्या संघटना धर्माच्या राजकारणाचा वापर करून एका बाजूला कामगार-कष्टकरी-युवकांना रोजगार, शिक्षण, आरोग्य, आवास अशा मुद्यांपासून भरकटवतात आणि दुसरीकडे हिंसक पद्धतींचा वापर करून त्यांचेच दमन करतात. आर्थिक धोरणांच्या बाबतीत काँग्रेस-भाजप मध्ये तर काहीच फरक नाही. खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरण (खाउजा) धोरणांवर त्यांचे पूर्ण एकमत आहे. फरक इतकाच आहे की काँग्रेस या धोरणांना लागू करण्यासोबत कल्याणकारी धोरणांचे, सुधारवादाचे थोडे नाटक करते, आणि सर्वधर्मसमभावाचा आव आणते; पण फॅसिस्ट हुकूमशाहीवादी पक्ष असल्यामुळे भाजप कल्याणवाद किंवा सुधारवादाच्या जास्त फसव्या दिखाव्यासोबतच खुलेआमपणे नग्न पद्धतीने भांडवलदारांची सेवा करते आणि कोणत्याही प्रतिरोधाला किंवा विरोधाला जास्त क्रूरपणे आणि पाशवीपणे तुडवते. यात एक गुणात्मक फरक नक्कीच आहे, आणि तो म्हणजे भाजपप्रणित फॅशिझम अत्यंत वेगाने देशातील लोकशाहील आतून पोखरून काढत आहे आणि तिचा फक्त वरवरचा दिखावा कायम ठेवला आहे. पण हे दोन्ही राष्ट्रीय पक्ष **देशी-विदेशी मोठ्या भांडवलाच्या हिताचे,** म्हणजे मोठमोठ्या देशी-विदेशी कंपन्यांच्या हितांचेच प्रतिनिधित्व करतात. हा मोठा भांडवलदार वर्ग आपल्या बदलत्या गरजांनुसार कधी काँग्रेसला तर कधी भाजपला आपले मुख्य समर्थन देतो. आज हा वर्ग फॅशिस्ट भाजपला

आपले समर्थन यामुळे देत आहे कारण 2008 साली अमेरिकेत सुरू झालेल्या आणि 2010-11 पर्यंत भारतात पोहोचलेल्या आर्थिक संकटामुळे म्हणजे मंदीमुळे भांडवलदारांना जगभरात फॅशिस्ट किंवा इतर प्रकारच्या हुकूमशाही आणि प्रतिक्रियावादी सरकारांची गरज आहे. हेच कारण आहे की फॅशिस्ट किंवा दक्षिणपंथी शक्ती फक्त भारतातच नाही तर ब्राझील, फिलिपीन्स, तुर्कस्थाना सोबत जगातील अनेक देशांमध्ये सत्तेत आल्या आहेत. त्यांचे उद्दिष्ट आहे **मंदी, म्हणजे नफ्याच्या घटत्या दराच्या संकटाचा** पूर्ण बोजा कष्टकरी वर्गांवर आणि कामगारांवर टाकणे—श्रम कायदे नष्ट करून, त्यांच्या नाममात्र अंमलबजावणीला सुद्धा समाप्त करून, बाल-मजूरी, बेगार आणि ठेकेदारीला खुली सूट देऊन कामगार-कष्टकऱ्यांच्या सरासरी मजूरीला कमी करणे आणि भांडवलदारांचा नफा वाढवणे. भाजप आपल्या दहा वर्षांच्या केंद्रातील आणि राज्यातील शासनकाळात हेच करत आली आहे.

**शिवसेनेचा** उदय झाला, त्या काळात वर्तमानपत्रांमध्ये तिला 'वसंतसेना' असे म्हटले जाई. मुंबईतील कामगार चळवळीला भरकटवण्यासाठी म्हणून मराठी-तामिळ असे राजकारण उभे करून कामगार वर्गाला भरकटवण्यासाठी तत्कालीन कॉंग्रेसचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या कृपाछत्राखाली ती बनली आणि आजपर्यंत कधी बिहारी, कधी हिंदू-मुस्लिम, कधी मंदिर-मशिद असे मुद्दे उभे करत, धार्मिक व प्रांतिक तणावांना निर्माण करत, शिवसेनेने इमानेइतबारे भांडवलदार वर्गाची सेवा केली आहे. आज भाजप सारखा कॅडर आधारित फॅशिस्ट पक्ष भांडवलदारांचा लाडका पक्ष झाल्यामुळे शिवसेनेसारख्या तुलनेने कमजोर प्रोटो-फॅशिस्ट प्रवृत्ती असलेल्या पक्षांची स्थिती बिकट झाली आहे. शिवसेना-उबाठाने आता कॉंग्रेस सोबत युती करणे, म्हणजे खऱ्या अर्थाने तिच्या पितृसंघटनेशी असलेले नाते निभावणे आहे.

**राष्ट्रवादी कॉंग्रेस** सारखा प्रादेशिक पक्ष, जो कॉंग्रेसमधूनच निर्माण झाला, तो साधारणपणे मध्यम जातींमधून, पारंपारिक जमीनधारक जातींमधून आलेल्या धनिक, खात्या-पित्या शेतमालक, मध्यम आणि मोठ्या उद्योगपती, ठेकेदार, बिल्डर, डीलर लोकांचे प्रतिनिधित्व करतो. हा पक्ष मोठ्या कॉर्पोरेट भांडवलदार वर्गाची सुद्धा सेवा करतो आणि त्यांच्याकडून निधी सुद्धा घेतो,

पण सोबतच मोठ्या भांडवलदार वर्गासोबत इतर समर्थक वर्गासाठी मोलभाव सुद्धा करतो.

आज भाजपच्या मांडीवर बसलेले किंवा आतून त्यांच्या निधीवर पोसलेले किंवा भाजपकरिता मत फोडण्याचे काम करणारे मनसे, आरपीआय(आठवले), वंचित, बसप, एमआयएम सारखे पक्ष उद्या विचारधारेचे कोणतेही आव न आणता कोणाच्याही कंपूत जाऊ शकतात. त्यांचे भांडवली चरित्रच त्यांना तसे बनवते.

**महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मनसे** हा राष्ट्रवादीच्या कृपाछायेमध्ये बनलेला पक्ष आहे जो शिवसेनेतून निघालेला आहे आणि त्यामुळे त्याचेही मूळ चरित्र तेच आहे. याचे दलाल चरित्र तर कधीच उघडे पडले आहे. तो सुद्धा बिल्डर-ठेकेदार लॉबीचाच पक्ष आहे. हा मुळात एक प्रोटो-फॅशिस्ट प्रवृत्तीचा पक्ष आहे आणि आता राजकीय संकटात सापडल्यावर कधी सर्वधर्मसमभावाचा तर कधी हिंदुत्वाचा तर कधी मराठी अस्मितेचा ढोंगी खेळ खेळू पहात आहे. पक्ष बनवल्यानंतर एका वर्तमानपत्रातील मुलाखतीत राज ठाकरेंनी खुलेपणाने उद्योगपती पक्षाला पैसे देतील असे सांगितले होते. या पक्षाची सर्व आंदोलने तडजोड करून संपतात, आणि कधी भाजपवर टीका करून मते खाण्याचे तर कधी भाजपला विनाशर्त समर्थन देण्याचे यांचे राजकारण जनतेला समजल्यामुळे विश्वासार्हता तळाला गेली आहे.

**आरपीआय(आठवले)** सारख्या अत्यंत संधीसाधू पक्षाबद्दल सुध्दा काही सांगायचीच गरज नाही, कारण ज्यांना शत्रू, धर्मवादी, फॅसिस्ट, वगैरे म्हटले त्या भाजपशी सत्तेसाठी, पैशासाठी युती करायला हे एका पायावर तयार झाले. अस्मितेचे राजकारण करून देशातील सर्वाधिक उत्पीडित असलेल्या दलित कामगार-कष्टकरी जनतेला भरकटवण्याचे काम हा पक्ष करत आहे. हा पक्ष दलित लोकसंख्येतून निर्माण झालेल्या मध्यमवर्ग, पांढरपेशा वर्ग, उच्च आणि उद्योगपती वर्गाचे प्रतिनिधित्व करतो.

**बहुजन समाज पक्ष, जो महाराष्ट्रात आता नगण्य राहिला आहे,** तो दलित लोकसंख्येतून निर्माण झालेल्या शासक वर्गाचे, खात्या-पित्या मध्यम वर्गाचे आणि अतिमागास जातींमधून निर्माण झालेल्या मध्यमवर्गाच्या हितांचे प्रतिनिधित्व करतो. याशिवाय, सामाजिक न्यायाची गोष्ट करत हा पक्ष सत्तेखातर आज उच्चजातीयांसाठी सुद्धा आरक्षणाची मागणी करत आहे.

अशाप्रकारचे संधीसाधू वर्तन या पक्षाचे चरित्रच राहिले आहे. देशभरामध्ये दलित आणि तथाकथित इतर खालच्या जातींवर अत्याचार करणाऱ्या आणि ब्राह्मणवादी विचारधारेचा आधारस्तंभ असलेल्या वर्गांचा पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षासोबत सत्तेसाठी हातमिळवणी करायला सुद्धा या पक्षाला काहीच हरकत नाहीये. अस्मितावादी राजकारण करत रिपाई, बसप सारखे पक्ष दलित जनतेचे मत घेतात, जी अनेकदा आपल्याच जातीतील कुलीन लोकांचे अनुसरण करत आपल्याच वर्ग हितांच्या विरोधात अनेकदा या पक्षाला मत देते.

**एम.आय.एम.** सारखे कधी मुस्लिमांच्या समर्थनामध्ये आक्रमक भाषा करणारे, धार्मिक कट्टरतावादाचे समर्थन करणारे आणि कधी संविधानवादाची भाषा करणारे पक्ष कोणत्याही कष्टकरी-कामगारांचे नाहीत तर मुस्लिम अस्मितेचे राजकारण करत उद्योगपती, उच्चवर्गीयांचे हितरक्षक आहेत. हा पक्ष देशातील बहुसंख्य ठिकाणी धर्माचे कार्ड खेळून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या फॅशिस्ट राजकारणालाच हातभार लावत आला आहे.

**वंचित बहुजन आघाडी** हा 'वंचित' लोकांचा चेहरा बनू पाहणारा पक्ष, संघाला वरवरचा विरोध दाखवणारा पक्ष, परंतु 2019 विधानसभा, 2024 लोकसभा निवडणुकीमध्ये करोडपती (वंचित!) उमेदवारांना तिकीट देण्यात आणि संघाच्या लोकांना नेतृत्वात आणण्यात संधीसाधूपणात मागे राहिला नाही. वंचितचे आणि भाजपचे नाते आता कोणापासूनही लपलेले नाही. 'सत्तेपासून वंचित' असा शब्द जेव्हा ते वापरतात, तेव्हा त्यांचा अर्थ सर्व गरिब, कष्टकरी, कामगार वर्ग नसतो, तर ऐतिहासिक रुपाने मागास जातींमधून पुढे आलेला एक अल्पसंख्यांक मध्यमवर्ग, उच्चवर्ग असतो, ज्याला भांडवली व्यवस्थेत सत्तेचा वाटा हवा आहे. अस्मितेचे राजकारण उभे करणारा हा पक्ष सुद्धा विरोधी अस्मितेला म्हणजेच फॅशिस्ट राजकारणाला वाढवणारा पक्ष ठरतो. वंचितने गेल्या काही वर्षात स्पष्टपणे भाजपच्या हिताकरिता काम करून, मत फोडण्याचे राजकारण करून, आपली विश्वासार्हता गमावली आहे.

याशिवाय **स्वाभिमानी शेतकरी संघटनेसारखे** पक्ष/गट हे श्रीमंत-मध्यम शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करतात. **शेतकरी कामगार पक्ष** किंवा **सीपीआय, सीपीएम** सारखे **लाल झेंडा मिरवणारे नकली कम्युनिस्ट पक्ष** आहेत जे

मध्यम-मोठे शेतकरी भांडवलदार, छोटे उद्योजक, मध्यमवर्ग, संघटीत मध्यमवर्गीय कामगार यांच्या गटांचे मुख्यत्वे प्रतिनिधित्व करतात. सीपीएम सारख्या पक्षांनी इतर राज्यांमध्ये सत्तेवर असताना कष्टकरी, आदिवासी, शेतमजुरांवर गोळ्या घालायला मागेपुढे पाहिले नाही आणि त्यांच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीरपणे भांडवलशाहीचे समर्थनही केले. ते जिथे सत्तेवर राहिले, तिथे कॉंग्रेस-भाजप प्रमाणेच खाउजा धोरणे लागू केली, आणि आज तर मालक वर्गाच्या एका हिश्श्याकडून हे निधीही घेतात! या नकली लाल झेंड्यावाल्या पक्षांच्या निधीचा एक मोठा हिस्सा संघटीत क्षेत्रात काम करणारे कर्मचारी, धनिक शेतकरी आणि मध्यम व्यापाऱ्यांकडून आणि मालकांकडूनही येतो. पण या वर्गांचा मोठा हिस्सा सुद्धा आज अस्तिवात असलेल्या भांडवली व्यवस्थेचा फायदा उचलणारा वर्ग बनला आहे—सतत डोक्यावर असलेल्या असुरक्षितता आणि बरबादीच्या टांगत्या तलवारीमुळे हा वर्ग त्रस्त आणि चिंतित असला, तरीही. हे तथाकथित कम्युनिस्ट पक्ष संघटीत क्षेत्रातील उपक्रमांच्या मजूरांमध्ये असलेल्या आपल्या केंद्रीय ट्रेड युनियन फेडरेशन्सच्या पकडीमुळे, आपल्या आर्थिक संसाधनांचा एक चांगला हिस्सा तेथून गोळा करतात. पण हे संसदपंथी डावे पक्ष खरेतर संघटीत क्षेत्रातील मध्यम आणि उच्चस्तरावरील कर्मचारी, मध्यम आणि धनिक शेतकरी, छोटे व्यापारी आणि उद्यमींच्या वर्ग हितांचेच अधिकाधिक प्रतिनिधित्व करतात आणि मोठ्या भांडवलदार वर्गाच्या लूटीला समाप्त न करता त्याला फक्त नियंत्रित करण्याची वकिली करतात, जे की शक्यच नाहीये.

आम आदमीचा म्हणवणाऱ्या **'आप'** पक्षाने दिल्लीमध्ये, पंजाबमध्ये 'इमानदारीने' मोठे आणि छोटे उद्योगपती, मध्यमवर्ग, ठेकेदार, बिल्डर, या सर्वांना दिलेली आश्वासने पूर्ण केली आणि कायमस्वरूपी रोजगार द्या म्हणणाऱ्या कंत्राटी कामगारांवर लाठ्या चालवल्या! किमान वेतन वाढवण्याची गोष्ट करणाऱ्या या पक्षाच्या दिल्लीतील बहुसंख्य आमदार-मंत्र्यांच्या स्वतःच्या कारखान्यांमध्ये किमान वेतन लागू होत नाही! यांचे वैशिष्ट्य हे आहे की सर्व निधीचे स्त्रोत जाहिर करून ते अमेरिकन भांडवलशाहीच्या धर्तीवर भारतीय जनतेच्या विचारात रुजवू इच्छितात की भांडवलदारांकडून निधी घेणे काही वाईट नाही, कारण ते जगाचे

`कल्याण'च करत आहेत. थोडक्यात यांची तथाकथित 'इमानदारी' ही मालकवर्गाशी आहे, कामगार वर्गाशी नाही!

या पक्षांनी आपसात कशाही प्रकारे आघाड्या बनवोत, किंवा युत्या बनवोत, आपसात वाटणीची गणिते, मुख्यमंत्री कोण, उपमुख्यमंत्री किती आणि कोण, नगरविकास-गृह-बांधकाम-महसूलासारखी धनिक खाते कोणाला, कोणाच्या कार्यकर्त्यांची कोणत्या पदांवर वर्णी लागली, या पक्षांमार्फत कोणत्या जातीच्या वा धर्माच्या नेत्याला लुटीची संधी मिळाली, यातून आपल्या जीवनात कोणताही मोठा फरक पडत नाही.

कामगार, कष्टकरी, शेतमजूर, सर्व कामकरी यांच्या बाजूचे राजकारण मांडणारा एकमेव पक्ष आहे भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष.

# 3. महाराष्ट्रातील आणि देशातील सध्याची राजकीय-आर्थिक-सामाजिक स्थिती

काँग्रेस-राष्ट्रवादीच्या प्रचंड भ्रष्टाचाराला, बेबंदशाहीला, कामगार विरोधी धोरणांना चिडून एकदा जनतेने 2014 साली भाजप-शिवसेनेचे सरकार निवडून दिले होते. या "डबल इंजिन" सरकारने जनतेला दिली नोटबंदी, घोटाळेच घोटाळे (चिक्की, कडकनाथ कोंबडी, व्यापम, महापोर्टल, सिडको, आरे मेट्रो शेड, तूरडाळ, शिवस्मारक, अग्निशमन, नालेसफाई, समृद्धी महामार्ग, ... असंख्य!), महागाई, बेरोजगारी, शिक्षणाचे बाजारीकरण, पर्यावरणाची बर्बादी, पूरग्रस्तांच्या हाल-अपेष्टा. असे असतानाही, भांडवलदारांनी पुरवलेल्या भरभक्कम निधीच्या, जोरदार खोट्या प्रचाराच्या, धर्मवादी प्रचाराच्या, मतदार याद्या व ईव्हीएम घोटाळ्याच्या आणि विरोधी पक्षांच्या विखुरलेपणाच्या जोरावर 2019 मध्ये पुन्हा युतीला बहुमत मिळाले.

परंतु **भांडवली पक्षांच्या युत्या-आघाड्या असतातच वाटण्यांच्या गणितासाठी.** परिणामी मुख्यमंत्री पदाच्या वादावरून उद्धव टाकरेंची शिवसेना अडून बसली. तिकडे ज्यांना तुरुंगात पाठवून "चक्की पिसवण्याच्या" गोष्टी केल्या होत्या, त्याच अजित पवारांसोबत फडणवीसांनी पहाटेचा शपथविधी पार पाडला. अशामध्ये एका "मोठ्या उद्योगपतीच्या" घरी मिटींगा होऊन, भाजप प्रमाणेच विचारधारेचे सर्व मतभेद विसरून, राष्ट्रवादी, काँग्रेस आणि शिवसेनेने हातमिळवणी केली आणि उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असलेले महाविकास आघाडी सरकार बनले. यानंतर अडीच वर्षात फडणवीसांच्या नेतृत्वात भाजपने ईडी, सीबीआयचा धाकासाठी वापर आणि "खोके" राजकारण करत शिवसेना फोडली आणि एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात सरकार बनवले, आणि नंतर बिल्डर-उद्योजक लॉबीच्या दबावाखाली त्यांचे "कार्यक्षम" नेते अजित पवार यांना पदावर बसवण्याकरिता राष्ट्रवादी पक्षही फोडून महायुतीचे सरकार चालले. आता महायुती आणि महाआघाडी या दोन्ही बाजूंना तथाकथित सर्वधर्मसमभावी आणि हिंदुत्ववादी असे पक्ष आहेत आणि विचारधारेच्या आणाभाका घेणारे, ज्यांना भ्रष्टाचारी, चोर, जातीयवादी, वगैरे म्हटले ते सर्वच एकमेकांच्या

मांडीला मांडी लावून बसले आहेत. अर्थात महायुतीचे चरित्र निश्चितपणे फॅशिस्ट आहे हे विसरता कामा नये.

**भ्रष्टाचाराचे आरोप असलेले सर्व नेते 'देशभक्त' भाजपमध्ये जाऊन 'पवित्र' झाले आहेत!** भ्रष्टाचाराच्या विरोधात एल्गार पुकारण्याचा आव आणणाऱ्या भाजपने गेल्या पाच वर्षांमध्ये शिक्षा करणे तर दूरच, सर्व भ्रष्टाचाऱ्यांना स्वतःमध्ये सामील करून घेतले आहे आणि ईडी सारख्या यंत्रणांची कधी खरी, कधी खोटी आणि कधी आपापसातील समझौत्याने भिती घालून भ्रष्टाचाराच्या विरोधात कारवाईचा फक्त आव निर्माण केला आहे.

कॉंग्रेस-राष्ट्रवादी-शिवसेनेच्या महाविकास आघाडी सरकारच्या 2019-2022 या काळात कोव्हिडचे संकट आले. **ऑक्सिजन, बेडवाचून तडफडून महाराष्ट्रात सुद्धा लाखोंचे जीव गेले,** आणि सरकारी आरोग्य व्यवस्थेची दैन्यावस्था, नफेखोरीतून चाललेली लूट समोर आली. मोदी सरकारप्रमाणेच ठाकरे-महाविकास आघाडी सरकारने सुद्धा या संधीमध्ये हात धुवून घेतले, आणि तत्कालिन सुविधा निर्माण करण्याच्या नावाखाली हजारो कोटी खर्च केले, पण नियमित सुविधा उभ्या केल्याच नाहीत. विनानियोजन लॉकडाऊनमुळे कामगारांना शेकडो किलोमीटर सायकल, व पायी जावे लागले आणि पोलिसांच्या लाठ्या खाव्या लागल्या. नफेखोरीतून आलेला निष्कळजीपणा इतका की पालघर, नाशिक, बांद्रा, भांडुप, विरार, मुंब्रा, अहमदनगर अशा अनेक ठिकाणी हॉस्पिटलमध्ये आगी लागून पेशंट मेले. कोव्हिड नंतरही या सरकारने **आरोग्य बजेट वर फक्त 3.5 टक्के रक्कम खर्च केली.** नगरसेवक, आमदार, **मंत्र्यांच्या घरांसाठी, गाड्यांसाठी या सरकारने 4.5 हजार कोटींपेक्षा जास्त खर्च** केला. सर्वधर्मसमभावाचा आव आणणाऱ्या या सरकारने एन.आर.सी. विरोधी आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचे फक्त जाहीर केले, परंतु अंमलबजावणी अत्यंत निवडकपणेच केली. आज महिलांचा कळवळा दाखवत आहेत, परंतु 2020 मध्ये महाराष्ट्रात 31,954 महिला अत्याचाराचे गुन्हे नोंद झाले, आणि संजय राठोडांसारख्या नेत्यांनाही वाचवले गेले! करोना काळात श्रीमंतांची मुलं विविध मार्ग काढून शिकली, पण गरिबांच्या मुलांचे शिक्षण सरकारन दुर्लक्षले, आणि अनेक विद्यार्थ्यांना तर शाळा सोडाव्या लागल्या. सरकारी

जागा न भरल्यामुळे यांच्याच काळात एमपीएससी, स्पर्धा परिक्षा विद्यार्थ्यांची असंख्य आंदोलने झाली. 2021 मध्ये देशातील सर्वाधिक अशा 1,834 विद्यार्थ्यांच्या आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या. याच वर्षी **2,489 शेतकऱ्यांनी तर 2020 मध्ये 2,547 शेतकऱ्यांनी आत्महत्या** केल्या. **अंगणवाडी असो वा एस.टी. कामगार** यांच्या आंदोलनांकडे आघाडी सरकारने कानाडोळा केलाच; **आशा कर्मचाऱ्यांवर तर लाठीमार** केला. बांधकाम कामगारांच्या नोंदण्यांची सुद्धा परवड सुरूच राहिली, आणि घरकामगारांचे बंद केलेले कल्याणकारी बोर्ड बंदच राहिले. पेट्रोल-डिझेलवरचा राज्य सरकारचा कर चढाच राहिला, आणि महाराष्ट्रातील **पेट्रोल-डिझेल देशाच्या इतर भागांपेक्षा महागच राहिले.** भ्रष्टाचाराच्या परंपरेला चालू ठेवत यांनी बीएमसी जमीन घोटाळा, कृषी पीक विमा घोटाळा, भात खरेदी घोटाळा, असे अनेक घोटाळे केले.

यानंतर सर्व प्रकारच्या लबाड्या करून जून 2022 पासून सत्तेत असलेल्या शिंदे-फडणवीस-अजित पवार महायुतीने महाविकास आघाडीला लाजवेल असा जनविरोधी कारभार केला आहे. ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले ते नारायण राणे, राधाकृष्ण विखे पाटील, कालिदास कोळंबकर, शिवेंद्रसिंह भोसले, संदीप नाईक, वैभव पछाड, अजित पवार, अशोक चव्हाण, प्रफुल पटेलांसारखे सर्व भ्रष्टाचारी आता **भाजपत जाऊन "पवित्र" झाले आहेत,** आणि ज्यांना "चक्की पिसायला" फडणवीस तुरुंगात पाठवणार होते, त्या अजित पवारांसोबत दोनदा शपथविधी करून आता त्यांच्यावरील खटले मागे घेतले आहेत. समृद्धी महामार्ग, अटल सेतू, शालेय गणवेश, बोगस बियाणे आणि खते, रिंग रोड, शिवाजीराजेंचा पुतळा, कांदा खरेदी, बीएमसी अधिकारी पुनर्नियुक्ती, दिवाळी फूड किट, नाशिक भूखंड, अशा अगणीत बाबींमध्ये हजारो कोटींचे घोटाळे केलेत. देशस्तरावर तर भाजपने केलेल्या घोटाळयांच्या यादीने अनेक पाने भरतील!

मोदी सरकारने लादलेले चार कामगार विरोधी कायदे राबवण्यात आणि **कामाचे तास 12 वर नेण्याकरिता** महायुती सरकारने कंबर कसून कामे केले आहे. दुसरीकडे यांच्या डबल इंजिन सरकारने डबल महागाई लादून जनतेची दैन्यावस्था केली आहे. **गॅस सिलिंडर 1200 रुपयावर, पेट्रोल 100**

रुपयांपार नेलेच; नुकतेच यांनी एप्रिलपासून आपल्यावर अभूतपूर्व वीजदरवाढ लादली आहे आणि वीजबिलात मोठी वाढ केली आहे.

बदलापूर सारख्या घटना जनतेच्या मनात ताज्या तर आहेतच, **महिला अत्याचारांच्या गुन्ह्यांची संख्या 2023 मध्ये 47,381 वर गेली आहे**! तपास यंत्रणा आणि न्यायव्यवस्थेवरील अविश्वासापायी जनतेचा एक हिस्सा "तत्काळ" निकाल, एन्काऊंटर व फाशीसारख्या मागण्या करत आहे, परंतु कायद्याच्या प्रक्रियेतून गुन्हेगार व त्यांचे पाठीराखे यांना जलदगती तपासाद्वारे शिक्षा होणे हीच योग्य कामगार वर्गीय भुमिका बनते. कायद्याची प्रक्रिया सोडून दिल्यास आपल्या हक्क-अधिकारांच्या लढ्यात कामगार-कष्टकऱ्यांना सुद्धा शासनाच्या दमनाचा असाच सामना करावा लागेल.

**आरोग्यव्यवस्थेचे धिंदवडे समोर येतच राहिले.** नांदेड येथील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय रुग्णालयात 30 सप्टेंबर 2023 पासून 48 तासांत अर्भकांसह 31 रुग्णांचा मृत्यू झाला. असे मृत्यू अनेक ठिकाणी झालेत, सगळया सरकारी रुग्णालयांची स्थिती अशीच भयावह आहे. विद्यार्थी आत्महत्यांमध्ये महाविकास आघाडीनंतर महायुती सरकारने सुद्धा राज्याला देशात सर्वाधिक पुढे ठेवले आहे, आणि 2024 वर्षात 1,764 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी आत्महत्यांमध्ये वाढच झाली आहे आणि 2023 मध्ये 2,851 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. मविआ सरकारच्या काळात एस.टी., अंगणवाडी, आशा कर्मचाऱ्यांचा, पुळका घेणाऱ्या भाजप-शिवसेनेने सत्तेत आल्यावर त्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. या सर्व जनविरोधी कारवायांना लपवण्यासाठी आणि जनतेला भरकटवण्यासाठी यांनी द्वेषाचे, धर्मवादाचे राजकारण जोमाने चालवत गोमाता, लव्ह-जिहाद, लँड जिहाद, वक्फ बोर्ड सारखे समाजात विष पसरवणारे मुद्दे सतत पुढे आणले आहेत, आणि विखारी भाषणे करणाऱ्या नितेश राणे, काजल सिंगला, कालिचरण, टी.राज सिंह, रामगिरी महाराज सारख्यांना मोकळे रान दिले आहे. स्वतःला तथाकथित "हिंदुत्वाचे" रक्षक म्हणणाऱ्या "डबल इंजिन" सरकारच्याच काळात हिंदूंना असुरक्षित घोषित करून धर्मरक्षण मोर्चे काढले गेले आहेत! त्याचवेळी भाजप आणि शिंदे-शिवसेनेने अजित पवारांसोबत युती करून दाखवून दिले

आहे की हिंदुत्व हे दाखवण्याचे दात आहेत, आणि खरे दात भांडवलदार वर्गाच्या हितरक्षणाचे आहेत!

आज महाराष्ट्रातील **रिपाई(आठवले)**तर खुलेपणाने “सत्तेसोबत” असल्याचे निर्लज्ज समर्थन करत आपले कामकरी विरोधी चरित्र उघड मांडत आहेत. दुसरीकडे **एम.आय.एम., वंचित, मनसे** सारखे पक्ष छुप्या पद्धतीने भाजपकरिता मतविभागणीचे काम करतात हे कोणापासूनही लपलेले नाही. सोबतच धनबळ, बाहूबळ, ईडी, सीबीआय सारख्या यंत्रणांचा वापर करून भाजपने फक्त इतर पक्षातील मालदार भ्रष्टाचारी नेत्यांना धमकावण्याचे काम केले आहे, कारवाई मात्र कोणावरही केलेली नाही.

**गेल्या 5 वर्षात आपले अपयश झाकण्यासाठी या दोन्ही सरकारांनी सर्वप्रकारे जातीय-धार्मिक तणाव वाढवण्याचे काम केले आहे**. मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण, धनगर आरक्षण या मुद्यांवर सर्वच पक्ष सर्व बाजूने बोलत आहेत आणि सर्वांना सर्व आश्वासने देत आहेत. सर्वच “जातींचे” कैवारी असल्याचा दावा हे करत आहेत. या दोन्ही सरकारांनी केलेले खाजगीकरण, कंत्राटीकरण, सरकारी भरती न करणे यामुळे अतिप्रचंड बेरोजगारीने पिचलेल्या कोट्यवधी युवक, विद्यार्थ्यांना कोट्यवधी नोकऱ्यांची गरज असताना काही हजार जागांच्या नाममात्र आरक्षणाच्या चौकटीत अडकवून ठेवत राज्यात तणाव निर्माण करत आहेत, आणि आपले रोजगार निर्मितीतले अपयश झाकत, भांडवली व्यवस्थेचे अपयश झाकत अस्मितावादाच्या आधारे मतांची बेगमी करण्यात गुंतले आहेत.

या दोन्ही युत्या-आघाड्या एकमेकांवर प्रचंड भ्रष्टाचाराचे आरोप करतात, आणि ते सगळे सत्यच आहेत! ही दोन्ही सरकारे एकमेकांवर बिल्डर धार्जिणी असल्याचे आरोप लावतात, ते सुद्धा खरेच आहे! या दोन्ही युत्या-आघाड्यांच्या काळात शेतकरी आत्महत्या, विद्यार्थी आत्महत्या, बेरोजगारी, महागाईने कळस गाठला आहे! आपल्याला नाममात्र मजुरीत 10-12 तास राबण्याची सक्ती केली आहे! या दोन्ही सरकारांच्या काळात हजारो कोटींचा फायदा बिल्डर, उद्योगपती, वाहतूक व्यावसायिक, धनिक शेतकऱ्यांना पोहोचवला गेला आहे! **ही दोन्ही सरकारे अडानी-अंबानी-टाटा-बिर्ला सारख्या बड्या भांडवलदार वर्गाची आणि राज्यस्तरावरील प्रादेशिक भांडवलदार वर्गाचीच सरकारे आहेत**!

या सगळयांच्या पलीकडे जाऊन 77 वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर सामान्य कष्टकरी जनता आजही अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधांपासून दूर अहे आणि रोजगारासाठी वणवण भटकत आहे ! अशामध्ये आलेल्या 2024 च्या विधानसभा निवडणुकांमध्ये कामगार-कष्टकरी वर्गाच्या मोठ्या हिश्श्यामध्ये प्रचंड निराशा आहे, सगळेच 'चोर' आहेत ही भावना प्रबळ आहे. त्यामुळे ‘मतदान करायचेच कशाला’ अशी भावना सुद्धा दिसून येते आहे. हे खरे आहे की निवडणुकांमधून क्रांतिकारी परिवर्तन होत नाही, पण म्हणून निवडणुकांच्या राजकारणाचे क्षेत्र आपण धनदांडग्यांसाठी मोकळे सोडायचे का?

नाही. आज गरज आहे आपण कामगार-कष्टकऱ्यांनी स्वतःची स्वतंत्र ताकद, स्वतःचा स्वतंत्र कार्यक्रम घेऊन कामगार वर्गीय राजकारण उभे करण्याची.

हे मात्र विसरता कामा नये की आज कामगारवर्गीय क्रांतिकारी राजकीय शक्ती तुलनेने कमजोर असताना, आम्ही लोकसभा 2024 च्या घोषणापत्रात मांडल्याप्रमाणे देश एका अभूतपूर्व फॅशिस्ट राजवटीखाली आहे. तिचा जोर 2024 च्या निवडणुकीतील कमी जागांनंतरही फक्त थोडासाच कमी झालेला आहे, आणि भाजप-संघ परिवाराच्या बजरंग दल, विहिंप, अभाविप सारख्या गुंडशक्ती आजही रस्त्यावर हैदोस घालत आहेत.

हे खरे आहे की जनतेने काँग्रेस, सपा, बसपा, आप, द्रमुक, अन्नाद्रमुक, जद(यू), जद(सेकु), तृणमूल काँग्रेस, राजद, शिवसेना, राष्ट्रवादी काँ, सीपीआय, सीपीएम, सीपीआय(एम.एल.) लिबरेशन इत्यादी यांना जरी निवडून दिले तरी हे पक्ष देखील खऱ्या अर्थाने लोकांचे प्रतिनिधित्व करू शकत नाहीत कारण ते देखील भांडवलदार वर्गाच्या विविध हिश्श्यांकडून मिळालेल्या देणग्या आणि अनुदानांवर चालतात आणि म्हणूनच केवळ भांडवलदार वर्गाच्या हितांचे प्रतिनिधित्व करतात. पण पूर्वी जनतेला सत्ताधारी पक्षाच्या जनविरोधी धोरणांसाठी त्याला शिक्षा करण्याचा अधिकार आणि संधी होती, जरी ही बाब वेगळी की या अधिकारामुळे जनतेच्या खऱ्या समस्या आणि मागण्यांवर कायमस्वरूपी आणि ठोस तोडगा निघणे शक्य नसते. सत्ताधारी पक्षाला त्याच्या पाच वर्षांच्या कुकर्मांमुळे जनता सत्तेतून बाहेर काढू शकायची आणि दुसरा पक्ष किंवा आघाडी निवडू

शकायची. पण आज हा अधिकारही हिरावून घेण्याचा प्रयत्न भाजपच्या मोदी-शाह राजवटीने विविध मार्गांनी केला आहे. परिणामी, आज भांडवली लोकशाहीचे फक्त कवच उरले आहे. **खरे तर आपण एका फॅशिस्ट युगात जगत आहोत. हा एक गुणात्मक बदल आहे, ज्याला समजून घेतल्याशिवाय देशातील कष्टकरी जनता त्यांच्या हितांच्या रक्षणासाठी लढू शकत नाहीत.** 2014 मध्ये मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर, फॅशिस्ट शक्तींची चालू असलेली सत्तेची चढाई गुणात्मकदृष्ट्या नवीन पातळीवर पोहोचली आहे. गेल्या 10 वर्षात मोदी-शाह राजवटीने ज्या पद्धतशीरपणे भांडवली लोकशाहीच्या सर्व संस्था आणि प्रक्रिया उद्ध्वस्त केल्या आहेत, तो याचा जिवंत पुरावा आहे.

महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही जरी भांडवलदार वर्गाच्याच आघाड्या असल्या, तरी महायुतीचे नेतृत्व भाजपसारखा कट्टर फॅशिस्ट पक्ष करत आहे, ज्याने देशातील सर्व लोकशाही यंत्रणेला आतून पोखरून लोकशाही अवकाश संपवत नेले आहे. अशामध्ये हे तर नक्कीच स्पष्ट आहे की **जनतेने या फॅशिस्ट पर्यायाला अजिबात निवडता कामा नये.** हे खरे आहे की निवडणुकीतील पराजयामुळे फॅशिझम पराभूत होऊ शकत नाही, परंतु त्या तत्कालिन पराभवामुळे जो थोडा लोकशाही अवकाश निर्माण होतो, तो कामगार वर्गाकरिता निश्चित गरजेचा आहे.

## 4. **भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष आपल्यामध्ये का?**

साथींनो, आज महाराष्ट्र आणि भारतातील भांडवली लोकशाही राजकारणाचे एक चित्र आम्ही वर प्रस्तुत केले. जीवनाचे वास्तव हे आहे की कष्ट करणारा कामगार, शेतमजूर आपली श्रमशक्ती अत्यंत कमी किमतीत विकण्यास बाध्य आहे, आणि त्याच्या श्रमाच्या शोषणातून मालक वर्ग भांडवलाच्या राशी गोळा करत चालला आहे. आज सर्व उत्पादन फक्त नफ्यासाठी होते, गरजा भागवण्यासाठी नाही. उत्पादनाच्या अभूतपूर्व, प्रचंड संपन्नतेच्या या जगात बहुसंख्य लोकांची विपन्नता फक्त मूठभर मालकांच्या नफ्याच्या लालसेपोटी निर्माण होते. प्रचंड प्रमाणात अन्न, कापड, घरं निर्माण होऊनही लोक उपाशी, निर्वस्त्र, बेघर आहेत. ज्यांच्या हातात उत्पादनाची साधनं आहेत ते भांडवलदार आज सर्व उत्पादनावर दावा सांगतात आणि त्यामुळेच सर्व राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक संरचनेवर त्यांचेच अधिराज्य चालते. ज्याच्याकडे जेवढी संपत्ती तेवढे त्याला वास्तवातले अधिकार जास्त हीच स्थिती आहे. प्रचाराचे नियम, मतदार संघाचा आकार, आचारसंहिता, इत्यादी बाबींची निवडणुकांसाठीची रचना सुद्धा अशी बनवली आहे ज्यामध्ये उच्च वर्गाचीच जिंकण्याची शक्यता जास्त असेल. अशामध्ये आज गरज आहे की देशातील सर्व संपत्तीचे निर्माण करणाऱ्या कामगार-कष्टकरी जनतेचा खरा राजकीय आवाज निर्माण व्हावा. असा **एखादा पक्ष जो की कामगार-कष्टकऱ्यांच्या संसाधनांवर उभा असेल आणि त्यांच्या राजकीय संघर्षांमधून तावून-सुलाखून निघालेल्या नेतृत्वाच्या पुढाकाराने उभा असेल.**

**भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष (Revolutionary Workers' Party of India, आर.डब्ल्यु.पी.आय.) असाच पक्ष** आहे ज्याला स्वतः कामगार, कामगार संघटक, आणि कामगार वर्गाच्या राजकीय संघटकांनी आंदोलनांच्या धगीत उभा केला आहे. हा कामगार वर्गाचा आपला स्वतःचा स्वतंत्र राजकीय पक्ष आहे जो कामगार वर्गाच्याच अग्रणी तत्वांद्वारे उभा केला जात आहे. **हा पक्ष कामगार वर्गाचे अग्रदल आहे आणि सर्व कष्टकरी जनतेच्या नेतृत्वकारी कोअरची भुमिका निभावण्यासाठी प्रतिबद्ध आहे.** भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष स्वतः कामगार वर्ग आणि

सामान्य कष्टकरी जनतेतील व्यक्तींनी दिलेल्या आर्थिक सहयोगावर काम करतो आणि हा कोणतीही देशी-विदेशी कंपनी, भांडवलदार घराणे, सरकार, एनजीओ, फंडींग एजंसी, निवडणूक ट्रस्ट किंवा इतर कोणत्याही भांडवली निवडणूकबाज पक्षांकडून कोणत्याही प्रकारे निधी घेत नाही. या प्रश्नाला आम्ही आर्थिक नाही तर राजकीय प्रश्न मानतो, कारण जो पक्ष कामगार कष्टकऱ्यांच्या आर्थिक संसाधनांवर उभा असतो, फक्त तोच पक्ष कामगार आणि सामान्य कष्टकरी वर्गाच्या हितांचे खऱ्या अर्थाने प्रतिनिधित्व करू शकतो.

**गेल्या 5 वर्षांमध्ये** एक अत्यंत छोटी सुरुवात करत आज पक्षाने महाराष्ट्राच्या काही शहरांमधील कामगार-कष्टकरी वस्त्या, आणि कामगारांच्या विविध घटकांच्या आंदोलनांमध्ये क्रांतिकारी हस्तक्षेपाची सुरूवात केली आहे. पक्षाच्या आणि अनेक जनसंघटनांच्या माध्यमातून पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जनतेच्या मुद्यांवर फक्त क्रांतिकारी हस्तक्षेपच केलेला नाही, तर वेळोवेळी केसेस अंगावर घेऊन पोलिसी दमनाचा सुद्धा हिमतीने सामना केला आहे आणि तुरुंगवासही भोगला आहे. *भगतसिंह राष्ट्रीय रोजगार हमी कायद्याकरिता आणि केजी ते पीजी मोफत शिक्षणाकरिता दिल्लीपर्यंत आंदोलन, कोव्हिड काळात जन स्वास्थ्य संघर्ष अभियान, कामगार कायद्यांच्या रक्षणाकरिता मजदुर संघर्ष संकल्प अभियान, कोव्हिड काळात अनेक ठिकाणी चालवलेली कम्युनिटी किचन, क्रांतिकारी सुधारकार्याद्वारे जनेतला एकजूट करण्याचे काम, एन.आर.सी. सी.ए.ए. च्या प्रश्नावर राज्यभरात लढा, अहमदनगर मध्ये पाणी प्रश्नाची सोडवणूक, मुंबईत गटार-नाले तुंबण्याविरोधात, प्रदूषणकारी एस.एम.एस. कंपनी विरोधात, आणि पर्यावरणाच्या रक्षणाची आंदोलने; पुण्यात पुरग्रस्तांच्या हक्कांकरिता, विविध वस्त्यांमधील पाणीप्रश्नावर, महिला सुरक्षेच्या तरतुदींकरिता, आंबिलओढा सफाईला घेऊन लढे; बांधकाम कामगारांच्या नोंदणी आणि रोजगार अधिकाराचे आंदोलन, प्रत्येक जातीय अत्याचाराच्या मुद्यावर आंदोलन आणि धर्मवादाच्या व अस्मितावादाच्या विरोधात ठाम-ठोस भुमिका घेत सतत संघ परिवाराच्या राजकारणाला तीव्र विरोध, एस.टी. कामगारांच्या लढ्यात नेतृत्वासोबत मैत्रीपूर्ण वैचारिक संघर्ष करत लढ्यात सहभाग आणि खटल्यांना दिलेले तोंड, देशव्यापी भगतसिंह*

*जनअधिकार यात्रेद्वारे महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार यांना तोंड फोडत जात-धर्मापलिकडे कामगार-कष्टकरी एकजूटीचा प्रचार, , पॅलेस्टाईनच्या स्वातंत्र्यलढ्याच्या समर्थनात आंदोलन,* अशा अनेक लढ्यांमार्फत पक्षाने एक नवीन आणि योग्य राजकारण रुजवण्याची सुरूवात केली आहे, आणि हे सर्व काम पूर्णतः सामान्य जनतेच्या आर्थिक सहयोगातूनच उभे केले आहे. आम्ही सर्व कामगार, गरीब शेतकरी, सामान्य कष्टकरी लोक, सामान्य स्त्रिया, गरीब दलित व आदिवासी जनता आणि निम्न मध्यमवर्गातील पिडलेल्या, त्रस्त लोकांना आवाहन करत आहोत की येणाऱ्या निवडणुकांमध्ये जर तुमच्या क्षेत्रात भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाचा उमेदवार उभा असेल तर त्याला एकजूट होऊन मत द्या आणि त्याला विजयी बनवण्यासाठी शक्य ते सगळे प्रयत्न करा. आम्ही इतर वर्गांमधून येणाऱ्या सर्व अशा व्यक्तींना, भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाला मत आणि समर्थन देण्याचे आवाहन करत आहोत, जे न्यायप्रिय, प्रगतीशील आणि ईहवादी व लोकशाही विचारांवर विश्वास ठेवतात. आम्ही तुम्हा सर्व कामगार-कष्टकरी भावा-बहिणींना, युवक साथींना आवाहन करत आहोत की तुम्ही भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाचे स्वयंसेवक बना आणि त्याच्या उमेदवारांचा विजय निश्चित करण्यासाठी आपली भुमिका निभावा. महायुती आणि महाविकास आघाडी जरी भांडवलदार वर्गाच्याच आघाड्या असल्या, तरी महायुती फॅशिस्ट आघाडी आहे, आणि तिचे सत्तेत येणे लोकशाही अवकाशाकरिता मोठी धोक्याची घंटा आहे. त्यामुळे ज्या मतदार संघांमध्ये भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाचा उमेदवार उभा नाहीये, तिथे आम्ही जनतेला आवाहन करत आहोत की फॅशिस्ट महायुतीला पराभूत करा.

आम्ही घोषणा करतो की जर भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाचा उमेदवार विजयी झाला, तर संपूर्ण आमदार निधीचा उपयोग पारदर्शक पद्धतीने आणि सामूहिक निर्णयातून विकास कामांना पूर्ण करण्यासाठी होईल. सोबतच, भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाचा आमदार फक्त एका कुशल कामगाराएवढेच वेतन घेईल आणि बाकी वेतन विकास निधीमध्येच सामील करेल. मतदार संघात येणाऱ्या सर्व सरकारी योजनांना पारदर्शक पद्धतीने लागू करवण्यासाठी त्यांचे सार्वजनिक ऑडीट केले जाईल आणि

सर्व विकास कार्ये ही जनतेद्वारे निवडलेल्या समित्यांच्या निगराणीखाली होतील.

भारतातील निवडणुकांमध्ये, जिथे बहुमत नाही तर सर्वाधिक मतांच्या आधारावर जागा जिंकता येतात तिथे, बेरीज-वजाबाकीचे राजकारण, एखाद्याला जिंकवण्यापेक्षा दुसऱ्याला पाडण्याचे राजकारण सतत केले जाते. परंतु आज कामगार-कष्टकऱ्यांनी भांडवलदारांच्याच एखाद्या पक्षाला वा उमेदवाराला जिंकवणे, किंवा पाडणे आणि त्यांचीच सत्ता चालू ठेवणे हा पर्याय न निवडता, आपल्या वर्गहिताचा राजकीय विचार ओळखणे आणि आर.डब्ल्यु.पी.आय. चा पर्याय निवडून आपला वर्गपक्ष बळकट करणे गरजेचे आहे.

नक्कीच, विधानसभेमध्ये कामगार वर्गाचे काही प्रतिनिधी असल्यामुळे कामगार सत्ता किंवा समाजवाद येणार नाही, पण हे सुद्धा सत्य आहे की या व्यवस्थेच्या चौकटीत कामगार वर्गाचे आर्थिक आणि राजकीय अधिकार त्याला जास्त चांगल्या पद्धतीने उपलब्ध होतील आणि सोबतच संपूर्ण व्यवस्थेच्या क्रांतिकारक रुपांतरणाचा संघर्ष सुद्धा पुढे जाईल. यामुळेच आम्ही आपल्याला आवाहन करत आहोत की येणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये तुम्ही जोरदारपणे आणि संघटीत व एकजूट पद्धतीने भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाला साथ द्या, पर्वती आणि मानखुर्द-शिवाजीनगर मतदारसंघात मत द्या, समर्थन द्या आणि उमेदवारांना विजयी करा.

## 5. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये आमचा कार्यक्रम

2024 च्या लोकसभा निवडणुकीच्या जाहिरनाम्यामध्ये आम्ही देशव्यापी परिवर्तनाचा एक कार्यक्रम प्रस्तुत केला होता. आम्ही तुम्हाला तो जाहीरनामा व कार्यक्रम नक्कीच वाचण्याचा आग्रह करू. त्याच कार्यक्रमाचा भाग म्हणून, राज्य सरकारांच्या अधिकारांची व्याप्ती पाहता आम्ही येणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमध्ये संघर्षाचा, परिवर्तनाचा आणि कामगार-कष्टकरी वर्गाच्या मागण्यांचा खालील कार्यक्रम प्रस्तुत करत आहोत.

1. कामाचा अधिकार खरेतर जगण्याचा अधिकार आहे. कामाच्या अधिकाराशिवाय जगण्याचा अधिकार फक्त एक फसवणूक आहे. 'भगतसिंह महाराष्ट्र रोजगार हमी कायदा' पास करण्यात यावा, ज्या **अंतर्गत वर्षभराच्या कायमस्वरूपी कामाची हमी सरकारने घ्यावी अथवा दर महिना रु. 15,000 बेरोजगारी भत्ता देण्यात यावा.**
2. प्रत्येक नियमित स्वरूपाच्या कामामधून आणि सर्व सरकारी कामांमधून **ठेकेदारी प्रथेला समाप्त करावे.**
3. महाराष्ट्रात नवीन 4 कामगार विरोधी कायद्यांची अंमलबजावणी करू नये.
4. राज्य सरकारच्या सर्व विभागातील आणि सार्वजनिक उपक्रमांमधील सर्व रिक्त जागा विनाविलंब भरती काढून भरण्यात याव्यात.
5. **कामाचे तास कायदेशीररित्या 6 केले जावेत.** 1970च्या दशकामध्ये देशात होणाऱ्या एकून उत्पादनाच्या मूल्यामध्ये मजूरीचे प्रमाण 30 टक्यांच्या जवळपास होते जे आता कमी होऊन 11 टक्यांच्या खाली आले आहे. कामगार वर्ग तेव्हापेक्षा कितीतरी जास्त उत्पादन आज करत आहे आणि तंत्रज्ञानाचा सुद्धा खूप विकास झाला आहे, ज्यामुळे कामगार वर्गाच्या उत्पादकतेत मोठी वाढ झाली आहे. पण यासोबतच मजूरी मात्र वाढलेली नाही, उलट कामाचे तास वाढले आहेत. हे पूर्णतः न्याय्य आहे की आज कामाचे तास 6 तास करण्यात यावेत. यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल.
6. **महाराष्ट्रामध्ये किमान वेतन कमीतकमी रु. 30,000 प्रति महिना करण्यात यावे.** आज यापेक्षा कमी वेतनामध्ये चार सदस्यांचे कुटूंब

आपल्या मुलभूत गरजाही पूर्ण करू शकत नाही. ज्या शहरांमध्ये जगण्याचा खर्च जास्त आहे, तेथे या रकमेला योग्य रुपाने अजून वाढवण्यात यावे.

7. सर्व उद्योगांमध्ये **कामगारांच्या सुरक्षिततेची पूर्ण व्यवस्था असावी** आणि मानदंडांनुसार सर्व सोयी असाव्यात.
8. **ओव्हरटाईमच्या व्यवस्थेला पूर्णपणे समाप्त करण्यात यावे**. कमी मजुरीमुळे कामगारांना 'स्वैच्छिक' किंवा जबरदस्ती ओव्हरटाईम करावा लागतो. हा कामगारांचे जीवन पाशवी बनवतो आणि त्यांना मशीन किंवा घाण्याचा बैल बनवून टाकतो. कामगार वर्गाच्या या अमानवीकरणाला थांबवण्यासाठी ओव्हरटाईमला पूर्णतः समाप्त करावे.
9. **रात्रपाळी (नाईट शिफ्ट) समाप्त करावी** आणि फक्त त्या उद्योगांमध्ये याची परवानगी असावी, जिथे हे अपरिहार्य आहे. या उद्योगांमध्ये सुद्धा रात्रपाळीचा काळ 4 तासांपेक्षा जास्त असता कामा नये आणि याचे संचालन सर्व उद्योगांमध्ये कामगार युनियन्सच्या देखरेखीखाली व्हावे.
10. शालेय वयापेक्षा (वय 16) कमी वयाच्या नवयुवक आणि मुलांद्वारे काम करवण्यावर पूर्ण बंदी आणावी. 16 ते 18 वर्षाच्या श्रमिकांचे कामाचे तास चार पेक्षा जास्त नकोत.
11. उद्योगाच्या त्या सर्व शाखांमध्ये स्त्री-श्रमावर बंदी असावी, ज्या स्त्री-आरोग्याला हानीकारक आहेत. सर्व स्त्री कामगारांना प्रसुतीच्या अगोदर सहा महिने आणि नंतर सहा महिने प्रसुती रजा पूर्ण वेतनासह मिळावी.
12. प्रत्येक ठिकाणी **स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे वेतन मिळावे** आणि अपरिहार्य नसेल तेथे स्त्रियांनी रात्री कामावर जाण्यावर बंदी असावी. रात्रपाळीची शिफ्ट चार तासांपेक्षा जास्त नसावी आणि त्यांना घरून आणण्याची व सोडण्याची योग्य व्यवस्था नियुक्तीकर्त्याची जबाबदारी असावी.
13. महिला अत्याचाराच्या प्रश्नांची तातडीने सोडवणूक होण्याकरिता मोठ्या संख्येने जलदगती न्यायालये स्थापन करावीत आणि कालबद्ध पद्धतीने पोलिस तपास पूर्ण व्हावा हे बंधनकारक करावे. कोणत्याही प्रकारे तडकाफडकी न्यायाच्या, एन्काऊंटर पद्धतीचे समर्थन करू नये.

14. ज्या उपक्रमांमध्ये स्त्रिया काम करतात, अशा कारखान्यांमध्ये, कार्यालयांमध्ये पाळणाघर आणि नर्सरीची योग्य व्यवस्था असावी; तसेच स्तनपान करवणाऱ्या स्त्रियांना कमीतकमी दर दोन तासांनी कमीतकमी अर्धा तास सुट्टी मिळावी.
15. सर्व उपक्रमांमध्ये **कमीत कमी एक दिवसाची साप्ताहिक सुट्टी मिळावी.**
16. कामगार आणि सामान्य कष्टकरी जनतेसाठीसरकारी विम्याची पूर्ण व्यवस्था असावी ज्या अंतर्गत सर्व प्रकारचे अपंगत्व, आजार, मुलांचा जन्म, जीवनसाथीचा मृत्यू, अनाथ झाल्यास सरकार द्वारे विमा रक्कम दिली जावी.
17. **वस्तूरूपामध्ये मजूरी देण्यावर पूर्ण बंदी आणावी** आणि प्रत्येक उद्योगामध्ये मजूरी देण्याची मासिक तारीख ठरवावी.
18. नियुक्तीकर्त्याद्वारे कोणत्याही कारणाने किंवा बहाण्याने मजूरी कपात करण्यावर पूर्ण बंदी आणावी.
19. श्रम विभागामध्ये मोठ्या प्रमाणात भरती करून त्याचा विस्तार करण्यात यावा. नवीन श्रम निरीक्षक, कारखाना निरीक्षक, आणि बॉयलर परीक्षकांची इतक्या प्रमाणात भरती करण्यात यावी की सर्व आर्थिक एककांची नियमित आणि खोलवर तपासणी करता यावी. सर्व **निरीक्षण दलांना 'थ्री-इन-वन' च्या सिद्धांतावर बनवण्यात यावे,** ज्यामध्ये सरकार द्वारे नियुक्त निरीक्षक, कामगार संघटना/युनियन्स द्वारे निवडलेले प्रतिनिधी आणि मालकांचे प्रतिनिधी असावेत, आणि कामगार प्रतिनिधींची बहुसंख्या असावी.
20. सर्व औद्योगिक एककांमध्ये श्रम आणि उत्पादनाच्या मॅनेजमेंटचे काम कामगारांनी निवडलेले प्रतिनिधी, मॅनेजर्स, आणि तंत्रज्ञांच्या 'थ्री-इन-वन' समित्यांकडे देण्यात यावे, ज्यामध्ये कामगार प्रतिनिधींची बहुसंख्या असेल. उत्पादनाची गती आणि त्याचे लक्ष्य या समितीद्वारेच निश्चित केले जावे.
21. स्त्री कामगार असलेल्या सर्व उद्योगांमध्ये स्त्री निरीक्षकांची व्यवस्था असावी.

22. सर्व उद्योगांसाठी स्वच्छता आणि आरोग्यविषयक कडक नियम कायदे बनवले जावेत ज्यानुसार सर्व औद्योगिक युनिट्स मध्ये स्वच्छ बाथरूम, शौचालय, इत्यादींची व्यवस्था असेल. याच्या तपासणीसाठी श्रम विभागामध्ये सॅनिटरी इन्सपेक्टरचे पद निर्माण करावे.

**23.** वरील गोष्टींची हमी देण्यासाठी श्रम कायद्यांमध्ये योग्य ते बदल केले जावेत आणि कायद्याचे उल्लंघन फौजदारी गुन्हा व दंडनीय अपराध करण्यात यावा. फक्त किरकोळ आर्थिक दंडाची मालकांना काहीच भिती किंवा समस्या नाहीये. यामुळे कोणत्याही **श्रम कायद्याचे उल्लंघन केल्यास कमीत कमी तीन महिन्यांची अजामीनपात्र शिक्षा व्हावी.**

24. **घर कामगारांसाठी वेगळया सरकारी लेबर एक्सचेंजची स्थापना व्हावी** ज्यामध्ये त्यांची नोंदणी होईल, आणि कोणत्याही व्यक्तीला घर कामगार पाहिजे असल्यास या एक्सचेंज द्वारे कामगार उपलब्ध केले जातील. घर कामगारांना किमान वेतनासहीत श्रम कायद्यांमध्ये दिले गेलेले सर्व अधिकार मिळावेत. त्यांच्यासाठी एक विशेष कायदा बनवला जावा ज्यामध्ये त्यांच्या सन्मान, घरांमध्ये त्यांच्यासोबत बरोबरीचा व्यवहार आणि त्यांच्या रोजगाराची हमी दिली जाईल. फक्त घर कामगारांची ओळख आणि नोंदणीच नाही, तर नियुक्तीकर्त्यांची सुद्धा तपासणी, ओळख आणि नोंदणी केली जावी.

25. तथाकथित **मजूर नाक्यांवर मजुरांसाठी सुद्धा वेगळे सरकारी लेबर एक्सचेंज स्थापन केले जावेत,** आणि त्यांची रोजंदारी किमान वेतनानुसार आणि कामाच्या तासांनुसार निर्धारित केली जावी. त्यांचे ओळखपत्र बनवले जावे आणि कोणत्याही नियुक्तीकर्त्याला कामगार मागवण्यासाठी याच एक्सचेंजला संपर्क करण्याची व्यवस्था करण्यात यावी.

26. **सर्व शेतमजूरांचे काम श्रम कायद्यांच्या कक्षेत आणले जावे** आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य ती संरचना निर्माण केली जावी. मनरेगा अंतर्गत वर्षभर कामाची व्यवस्था करण्यात यावी. गरीब आणि मध्यम शेतकऱ्यांसाठी (जे नियमितरित्या श्रमशक्तीचे शोषण करत नाहीत आणि सामान्यतः स्वतःच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या श्रमाचा वापर करतात) बियाणे, खते, वीज इत्यादींवर अनुदान देण्याची योग्य

तरतूद करण्यासाठी श्रीमंत वर्गावर विशेष कर लादण्यात यावा. सरकारी सिंचन आणि संस्थात्मक कर्जाचीही योग्य व्यवस्था करावी.

27. सर्व उद्योगांमध्ये औद्योगिक आणि श्रम न्यायालयांची व्यवस्था केली जावी ज्यांच्याकडे औद्योगिक विवादांचा निपटारा करण्यासाठी आणि श्रम कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी अधिकार असावेत.
28. **सर्व योजना (स्कीम) कामगार, जसे अंगणवाडी, आशा, इत्यादींना कायम रोजगार देण्यात यावा** आणि एकात्मिक बाल विकास योजना व ग्रामीण आरोग्य मिशन सारख्या विशेष मिशनच्या ऐवजी, या सगळ्या कल्याणकारी कामांसाठी सरकारने योग्य ते सरकारी विभाग स्थापन करावेत आणि या कामांना सरकारच्या धोरणांचे अंग बनवावे, ना की कोण्या विशेष योजनेचे.
29. गिग वर्कर्सला सर्व श्रम कायद्यांच्या चौकटीत आणण्यासाठी आणि त्यांना सर्व सामाजिक सुरक्षितता देण्यासाठी एक राज्यस्तरीय कायदा बनवला जावा.
30. हाताने मानवी मैला वाहण्याच्या प्रथेवर त्वरित बंदी घालावी.

*

31. राज्य सरकारद्वारे वसूल केले जाणारे व्हॅट, एस्काईज, सेल्स सारखे सर्व अप्रत्यक्ष कर रद्द केले जावेत. पेट्रोल-डिझेलवरील राज्य सरकाराचा कर रद्द करावा.
32. राज्याच्या स्तरावर विशेष आर्थिक क्षेत्र (एस.ई.झेड.) च्या कायद्याची अंमलबजावणी रद्द करण्यात यावी आणि सर्व अस्तित्वात असलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांना बंद करण्यात यावे.
33. कॉर्पोरेट हितांसाठी जबरदस्ती भूमी संपादनावर बंदी आणावी आणि जर जनहितासाठी भूमी अधिग्रहण अनिवार्य असेल, तर प्रभावित होणाऱ्या सर्व जनतेच्या योग्य त्या पुनर्वसनाची पूर्ण व्यवस्था केली जावी.

*

34. **राज्यात नवीन शैक्षणिक धोरण, 2020 तत्काळ रद्द करण्यात यावे. खाजगी शाळा आणि शिक्षण संस्थांना पूर्णत: समाप्त केले जावे** आणि प्रत्येक नागरिकाला प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत

समान आणि मोफत शिक्षणाची सोय केली जावी. मूल कोणाचेही असो, त्यांना समान शिक्षण मिळावे. शालेय शिक्षणाला उत्पादनाशी संबंधित प्रशिक्षणाशी जोडावे आणि हे सर्व मुलांसाठी अनिवार्य असावे.

35. प्रत्येकाला त्याच्या मातृभाषेमध्ये शिक्षण, काम, विचार, आणि अभिव्यक्तीचे पूर्ण स्वातंत्र्य आणि प्रोत्साहन असावे. जनतेला मराठी व इतर भाषांमध्ये शिक्षण घेण्याचा, सर्व प्रशासकीय कामांमध्ये, न्यायालयीन कारवायांमध्ये भाग घेण्याचा अधिकार असावा. न्यायालये, सरकारी कचेऱ्या, आणि सर्व विभागांचे काम मराठीत आणि गरजेनुसार इतर भाषांमध्ये सुद्धा व्हावे. कोणत्याही भाषेला राज्यभाषेचा दर्जा देण्यात येऊ नये. महाराष्ट्रातील प्रत्येक गैर-मराठी नागरिकाला सुसंगत लोकशाही अधिकारांतर्गत त्यांच्या भाषेत शिकण्याचा, सरकारशी व्यवहाराचा, न्यायालयीन कारभाराचा आणि सर्व संधींचा अधिकार असावा.

*

36. **सर्व कष्टकरी लोकांसाठी सरकारी घरकुलाची सोय केली जावी**. हे घरकुल त्यांना भोगाधिकारावर दिले जावेत. यासाठी **रिकामे पडलेले अपार्टमेंट्स, फ्लॅट्स आणि घरं सरकारने जप्त करावेत**.
37. सर्वांना मोफत आरोग्य सुविधेची हमी सरकारने द्यावी. याअंतर्गत सर्व उपचार आणि औषधांचा खर्च सरकारची जबाबदारी असावी.
38. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रेशनची प्रभावी व्यवस्था निर्माण केली जावी आणि प्रत्येक भागामध्ये रेशनचे दुकान उघडण्यात यावे.
39. नवीन पेंशन योजनेला तत्काळ रद्द करून, कामगार संघटनांसोबत चर्चा करून, एक नवीन तर्कसंगत आणि न्यायसंगत पेंशन योजना लागू करावी.

*

**40. राज्यसत्तेला धर्म, धार्मिक संस्था आणि प्रत्येक प्रकारच्या धार्मिक कार्यांपासून पूर्णपणे स्वतंत्र केले जावे.**

41. धर्माला राजकीय आणि सामाजिक जीवनापासून पूर्णतः वेगळे केले जावे आणि याला पूर्णतः नागरिकांची खाजगी बाब बनवले जावे.

42. सर्व शिक्षण संस्थांना धर्म आणि धार्मिक कार्य, जसे धार्मिक प्रार्थना, धार्मिक अनुष्ठान, धार्मिक प्रतिके, इत्यादींपासून दूर केले जावे.

*

43. प्रत्येक गाव आणि शहरामध्ये **नागरिकांच्या मोहल्ला समित्यांची स्थापना** व्हावी आणि सर्व सरकारी योजनांमध्ये होणाऱ्या आर्थिक तरतुदींच्या उपयोगाचा निर्णय या समित्यांच्या हातामध्ये असावा.
44. राज्यातील सर्व प्रकारच्या नैसर्गिक संपत्तीवर सरकारचे पूर्ण नियंत्रण असावे आणि त्यांना कोणत्याही प्रकारच्या कराराद्वारे कॉर्पोरेट कंपन्यांना लूटीसाठी देण्यावर तत्काळ बंदी आणावी.
45. सर्व शारीरिक आणि मानसिक अपंग व्यक्ती, अनाथ मुलं, लाचार वृद्धांच्या सगळ्या मुलभूत आवश्यकता पूर्ण करण्यासाठी योग्य सामाजिक सुरक्षा कायदा बनवला जावा आणि सरकारची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.
46. कौटुंबिक हिंसा, अत्याचाराला बळी पडलेल्या एकल महिलांसाठी रोजगार आणि घरकुलाची व्यवस्था करणे सरकारची जबाबदारी असेल आणि याची खात्री देण्यासाठी कडक कायदा करण्यात यावा.
47. सर्व शहरांमध्ये आणि गावांमध्ये अशी सामुदायिक केंद्र बनवण्यात यावीत जेथे खेळांची सोय, व्यायामशाळा, पुस्तकालय-वाचनालय, आणि सांस्कृतिक केंद्र असेल, जिथे सर्व नागरिकांना बरोबरीने शारीरिक आणि मानसिक विकासाची संधी मिळेल.

*

**48. मकोका सारखे सर्व दमनकारी आणि लोकशाही विरोधी कायदे तत्काळ रद्द करावेत.**

49. राजद्रोहाच्या दमनकारी वसाहतकालीन कायद्याला तत्काळ संपवण्यासाठी, सोबतच आयपीसी, सीआरपीसी आणि जेल मॅन्युअल सारखे वसाहतकालीन काळातील सर्व जनविरोधी कायदे आणि नियम व ऑफिशिअल सिक्रेट्स ॲक्ट रद्द करण्यासाठी राज्य सरकारने स्वतःच्या स्तरावर आणि केंद्र सरकारवर दबाव आणण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलावीत.

50. कलम 144 वा त्याची अंमलबजावणी तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात यावी.
51. सर्व राजकीय कैद्यांना राजकीय कैद्यांचे सर्व अधिकार दिले जावेत आणि काळ्या कायद्यांअतर्गत अटक केलेल्या सर्व राजकीय कैद्यांना तत्काळ मुक्त करावे.
52. ज्या कायद्यांद्वारे कामगार आणि कर्मचाऱ्यांचा संप करण्याचा लोकशाही अधिकार हिरावून घेतला गेला आहे. असे कायदे रद्द करावेत.
53. कॉर्पोरेट कंपन्यांना वन संपत्ती आणि पर्यावरणाच्या लुटीची खुली सूट देणारे काम्पा आणि ईपीए सारखे कायदे तत्काळ रद्द करावेत आणि आदिवासींना त्यांच्या जल, जंगल, जमिनीच्या सामुदायिक भोगाधिकारापासून बेदखल करणारे सर्व आदेश, नियम, कायदे तत्काळ रद्द करावेत. प्रदूषण करणाऱ्या उद्योगांच्या मालकांवर कडक दंडात्मक कारवाई करण्यात यावी.
54. कामगारांना युनियन बनवण्याचा पूर्ण अधिकार मिळावा आणि यामध्ये बाधा बनणाऱ्या कायद्यांना आणि नियमांना तत्काळ प्रभावाने रद्द करावे.
55. महाराष्ट्रामध्ये राष्ट्रीय नागरिकता रजिस्टर लागू करू नये.
56. राज्यातील कोणत्याही निवडणूकीमध्ये आणि इतर राजकीय कामांमध्ये धार्मिक चिन्ह, धार्मिक भावना, जातीय ओळख, आणि जातीय भावनांना कोणत्याही रूपात वापर करण्यावर पूर्ण बंदी घालण्याच्या हेतूने कठोर कायदे बनवले जावेत आणि त्यांचे उल्लंघन केल्यास राज्य निवडणूक आयोग आणि राज्य सरकारने कडक दंडात्मक कारवाई करावी.
57. दंगलींमध्ये दोषी असलेल्या व्यक्ती, संघटना, इत्यादींच्या विरोधात कठोर दंडात्मक कारवाई करण्यासाठी कडक कायदे बनवले जावेत.
58. महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही सरकारांच्या काळात झालेल्या सर्व घोटाळ्यांची न्यायालयीन चौकशी केली जावी.

*

59. **सामाजिक छळाच्या सर्व रूपांना आणि त्या आधारे होणाऱ्या भेदभावाला दंडनीय गुन्हा घोषित करण्यात यावा. सरकारने लैंगिक व लिंगभाव (जेंडर) समानतेचे तत्त्व सर्व राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरांवर लागू केले पाहिजे आणि त्यावर**

**आधारित भेदभाव हा दंडनीय गुन्हा म्हणून घोषित केला पाहिजे. फक्त अस्पृश्यताच नाही तर जातीय आधारावर होणाऱ्या भेदभावाला तत्काळ दंडनीय अपराध घोषित केले जावे,** तसेच विवाहाच्या जातीय जाहिरातींवर, जाती आधारित संघटनांवर व पंचायतींवर तत्काळ बंदी घालावी.महिलांच्या स्वातंत्र्याची हमी देण्यासाठी सर्व गावांमध्ये आणि शहरांमध्ये, गल्ल्या आणि कॉलन्यांमध्ये पाळणा घर, नर्सरी आणि डे-बोर्डींग (निवास) व्यवस्था केली जावी आणि सोबतच विशाल सामुदायिक भोजनालयांचे निर्माण सरकारने करावे, जिथे खर्चाएवढ्या दराने जेवण मिळेल.

*

60. निवडणूक प्रक्रियेमध्ये इलेक्ट्रॉनिक व्होटींग मशिनचा वापर पूर्णतः समाप्त करून **कागदी मतपत्रिका परत आणण्यासाठी पुढाकार घ्यावा.**
61. सर्व सरकारी संस्थांचे सार्वजनिक ऑडीट करावे आणि हे ऑडीट जनतेने निवडून दिलेल्या समित्यांद्वारे व्हावे.
62. **पोलिस दलाला शांततेच्या काळात उत्पादक कामांमध्ये लावले जावे** आणि त्यांना सर्व लोकशाही अधिकार जसे की राजकीय साहित्याचे अध्ययन करणे, युनियन बनवणे, संप करणे, इत्यादी दिले जावेत.

*

63. **कोणताही सरकारी अधिकारी किंवा निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीला एका कुशल कामगारापेक्षा जास्त वेतन नसावे.** कालांतराने देशाच्या आणि राज्याच्या स्तरावर सर्व अधिकाऱ्यांच्या निवडणुकीची व्यवस्था असावी आणि त्यांना तत्काळ परत बोलावण्याचा अधिकार मतदात्यांकडे यावा. फक्त तेव्हाच भ्रष्टाचारावर लगाम लावला जाऊ शकतो.
64. **सर्व आमदार, नगरसेवक, मंत्री, नोकरशहा यांना मिळणाऱ्या सर्व विशेषाधिकारांना आणि विशेष सुविधांना समाप्त केले जावे.**
65. कॉर्पोरेट भांडवलाद्वारे नियंत्रित, मीडीयाची महाकाय यंत्रणा सत्याला दाबून टाकण्यासाठी, विविध प्रकारच्या असत्यांच्या प्रचारासाठी आणि शोषक-उत्पीडक सत्तेच्या बाजूने सहमती निर्माणाचे हत्यार बनले आहे.

दुसरीकडे सत्तेला विरोध करणाऱ्या जनतेच्या मीडियाच्या साधनांना विविध प्रकारे नियंत्रित आणि बाधित केले जाते. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मूळ कल्पनेला कायम ठेवत मीडियावर देखरेख करण्यासाठी जनतेमधून निवडलेल्या प्रतिनिधींना घेऊन अशी यंत्रणा उभी करावी जी बातम्या आणि मनोरंजनाच्या माध्यमांना असत्य, अंधविश्वास आणि अवैज्ञानिक गोष्टींचा प्रचार करण्यापासून थांबवेल आणि तथ्याला धरून रिपोर्टींगची खात्री देईल. **खोट्या बातम्या (फेक न्यूज) वर प्रभावी लगाम कसण्यासाठी परिणामकारक कायदा बनवला जावा.** सरकारी जाहिराती आणि सबसिडीच्या धोरणाला पारदर्शक पद्धतीने लागू केले जावे.

66. सर्व प्रकारच्या मीडीयामध्ये काम करणाऱ्या मीडीयाकर्मींच्या आर्थिक हितांच्या, राजकीय अधिकारांच्या(जसे संघटीत होणे आणि युनियन बनवणे) तसेच सुरक्षिततेच्या हमीसाठी एक कडक कायदा बनवला जावा आणि अशा व्यवस्थेची खात्री दिली जावी ज्याद्वारे त्यांच्या कामामध्ये सरकार किंवा भांडवलदार वर्गाद्वारे पैशाच्या शक्तीच्या जोरावर हस्तक्षेप होऊ नये.

67. सरकारद्वारे विविध गुप्तहेर आणि पोलिस एजंसींना विनाअडथळा नागरिकांवर गुप्त पाळत आणि त्यांच्या खाजगी जीवनामध्ये हस्तक्षेपाचा अधिकार दिला आहे. याला तत्काळ रद्द केले जावे आणि जर लोकांच्या सुरक्षेसाठी एखाद्या संभाव्य धोक्यामुळे एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेवर नजर ठेवण्याची आवश्यकता असेल तर त्यासाठी लोकप्रतिनिधींच्या एखाद्या निवडून आलेल्या समितीकडून लेखी आज्ञा घेतली जावी.

**भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाला साथ द्या,**
**भांडवलशाहीला मात द्या!**

**अंधकाराचे युग हटणार,**
**जो लढणार तो जिंकणार !**

'भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष' (RWPI) हा भारतातील सर्व कामगार-कष्टकऱ्यांचा क्रांतिकारी पक्ष आहे. हा त्यांनीच मिळून बनवलाय आणि त्यांच्याच संसाधनांवर चालतो. RWPI भांडवलदार वर्गाच्या कोणत्याही हिश्श्याकडून कोणत्याही प्रकारचे योगदान घेत नाही. आमचे अंतिम लक्ष्य क्रांतिकारी पद्धतीने कामगार वर्गाच्या सत्तेची स्थापना आणि समाजवादाची निर्मिती आहे, ज्यात उत्पादन, राज्यकारभार, आणि समाजाच्या संपूर्ण संरचनेवर कामकऱ्यांचा अधिकार असेल, आणि निर्णय घेण्याची शक्ती वास्तवात त्यांच्या हाती असेल. याच उद्दिष्टाला पुढे नेण्यासाठी आणि कामगार वर्गाची स्वतंत्र भूमिका प्रस्तुत करण्यासाठी आम्ही 2024 लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्र विधानसभा 2024 निवडणुकीत सहभागी होत आहोत.

## राज्य स्तरावर आमच्या संघर्षाचे काही प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे:

1. प्रत्येक व्यक्तीला नियमित काम, किमान मजुरी रु. 30,000 किंवा किमान महिना रु. 15,000 बेरोजगारी भत्ता देणारा 'भगतसिंह महाराष्ट्र रोजगार हमी कायदा'!

2. सर्वांना केजी ते पीजी पूर्णत: मोफत आणि समान शिक्षणाचा कायदा

3. प्रत्येक व्यक्तीला पूर्णत: मोफत आणि दर्जेदार इलाज

4. प्रत्येक वृद्धाला घरपोच रु. 10,000 पेन्शन!

4. बांधकाम कामगार, रोजंदारी कामगार अशा सर्व असंघटीत कामगार-कष्टकरी व्यक्तिंकरिता घरपोच सामाजिक सुरक्षा विमा!

5. ठेकेदारी पद्धतीचे उन्मूलन!

6. घरकामगार, बांधकाम कामगार, सारख्या असंघटित कामगारांची नोंदणी, रोजगार, सामाजिक सुरक्षेचा कायदा आणि विशेष सरकारी एक्सचेंजचे निर्माण!

7. सर्व रिक्त सरकारी पदांवर त्वरीत भरती!

या घोषणापत्रासोबतच आम्ही आपणास आमचे लोकसभा निवडणुक 2024 चे घोषणापत्र सुद्धा वाचण्याचे आवाहन करत आहोत.